सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महसूल व वन विभाग
# जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक
## ( गौणखनिज शाखा )
## जुने सि.बि.एस.जवळ नाशिक

फोन नं. 0253-2319006

ई-मेल – districminingnsk@gmail.com

जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक यांच्याकडून महाराष्ट्र राज्यातील सर्व शासन मान्यता प्राप्त पर्यावरण सल्लागार (Accredited Environment Consultant) यांना कळविण्यात येते की, नाशिक जिल्हयातील सन-2026-2027 व 2027-2028 या दोन वर्षाकरिता वाळू गटांच्या पर्यावरण अनुमती मिळवण्यासाठी, Form 1/M, EIA, EMP, PFR, Mining Plan, District Survey Report, ( For Minor Minerals) व शासकीय जमिनीवर खाणपट्टयांचे जाहीर लिलाव करण्यासाठी खाणपट्यांचे भूविज्ञानकीय तांत्रीक अहवाल (GTR)तयार करण्यासाठी ई-निविदा खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मागविण्यात येत आहे. सदरील निविदाबाबत सर्व अटी व शर्ती www.nashik.nic.in व www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. ई-निविदाबाबत वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी | दिनांक - 12/05/2026 |
| ई-निविदा स्वीकृती | दिनांक- 13/05/2026 रोजी सकाळी 10.00 वा. पासून ते दिनांक - 26/05/2026 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत |
| ई-निविदा उघडणे | दिनांक - 28/05/2026 रोजी सकाळी 11.00 वा. |

**अटी व शर्ती :-**

1) निविदाधारक हा महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणे आवश्यक आहे.
2) ई- निविदा अर्ज शुल्क रु.5000/- ऑनलाइन पध्दतीने भरणा करावे लागेल.
3) ई-निविदा इसारा रक्कम रुपये 75000/- ऑनलाईन पध्दतीने भरणा करावा लागेल. तसेच अयशस्वी निविदाधारकांची इसारा रक्कम बिनव्याजी परत करण्यात येईल.
4) ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर होईल अशा निविदाधारकास सुरक्षा अनामत रक्कम 100000/- असेल. उक्त नमुद इसारा रक्कम निविदा मंजुर निविदाधारकाच्या अनामत रक्कमेमध्ये समायोजित करण्यात येईल व उर्वरीत सुरक्षा अनामत रक्कम ही डी.डी स्वरुपात सात दिवसाच्या आत जमा करावे लागेल. सदर अनामत रक्कम यशस्वीरित्या पर्यावरण अनुमती प्राप्त झालेल्या वाळु गटाचा कालावधी पुर्ण होईपर्यंत जमा राहील.
5) पर्यावरण सल्लागार (Accredited Environment Consultant) Mining of Minerals या विभागात Quality Council of India (QCT) किंवा National Accreditation Board For Education and Training या द्वारे मान्यताप्राप्त असणे आवश्यक आहे.
6) वाळू गटांच्या पर्यावरण अनुमती मिळवण्यासाठी Form 1/M, EIA, EMP, PFA Mining Plan व District Survey Report (For Minor Minerals) तयार करण्याचा कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
7) महसूल व वन विभाग शासन निर्णय दि.16/02/2024, केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दि.14 सप्टेंबर 2006 (EIA Notification), दिनांक 15.01.2016 व दिनांक 03.03.2016 च्या तसेच Sustainable Sand Mining Guidelines 2016 व Sand Mining Feamework 2018 च्या तरतूदी लागू राहतील.
8) सदर निविदा नाशिक जिल्हयातील सन-2024-2025 व सन-2025-2026 या दोन वर्षाकरिता शासन नियमाप्रमाणे निश्चित केलेल्या वाळू गटांकरिता असेल. वाळू / रेती सुधारित धोरण व प्रचलित शासन निर्णय,परिपत्रक प्रमाणे गृहीत धरण्यात येईल.
9) एका वाळू गटाकरिता सर्वात कमी किंमत ई-निविदा मध्ये प्राप्त होईल ती निविदा अट क्र. 2,3 व 4 च्या अधीन राहून मान्य करण्यात येईल.
10) निविदा मान्य झाल्यावर कोणतेही अग्रिम रक्कम अनुज्ञेय राहणार नाही.
11) Form 1/M, EIA, EMP, PFR, Mining Plan व District Survey Report (For Minor Minerals) केंद्र शासनाच्या पर्यावरण वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दिनांक 15.01.2016 च्या तरतुदीनुसार व शासन नियमाप्रमाणे रेती गट निश्चित केल्यावर 20 दिवसात पुर्ण करणे बंधनकारक राहील.
12) शासकीय जमिनीवर खाणपट्यासाठी जागा निश्चित करतांना तहसिलदार यांना मार्गदर्शन करणे बंधनकारक राहील.

13) ज्या वाळूगटास / शासकीय जमिनीवरील खाणपट्यास राज्यस्तरीय पर्यावरण समितीची मान्यता मिळाल्यावर पुर्ण रक्कम अनुज्ञेय राहील.

14) वाळू लिलाव झाल्यावर संबंधीत लिलावधारकाच्या नावे पर्यावरण अनुमती वर्ग करुन देणे, Mining Plan व इतर आवश्यक तांत्रिक कागदपत्रे संबंधीत लिलावधारकाच्या नावे हस्तांतरण करणे आवश्यक राहील.

15) राज्यस्तरीय पर्यावरण बैठकीस Mining of Minerals प्रवर्गातील in – house expert हजर राहणे आवश्यक राहील व प्रतिनिधी पाठवण्यात येऊ नये व याबाबत कुठलाही वाहन भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

16) निविदा मान्य झाल्यावर रक्कम रु.100/- च्या मुद्रांकनावर करारनामा करावा लागेल.

17) अटी व शर्तीचे अनुपालन न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल आवश्यकतेप्रमाणे इतर दंडात्मक रक्कम देयकातुन वजा केली जाईल.

18) देय रकमेमधून 2% TDS आणि 2% GST कपात ही शासन निर्णय क्र. संकीर्ण 2018/प्र.क्र. 144/2018/ कोषा प्रशा-5 दि. 28 सप्टेंबर, 2018 नुसार करण्यात येईल.

19) अटी व शर्तीचे पालन न केल्यास कुठलीही पुर्वसुचना न देता कोणत्याही वेळी करार रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी नाशिक यांना राहतील.

20) अटी व शर्ती मध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी नाशिक यांना राहतील.

21) सदर प्रकरणी काही वाद उदभवल्यास नाशिक न्यायपालिकेच्या अधिकार क्षेत्रात सोडवण्यात येतील.

22) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे काही निर्देश प्राप्त झाल्यास निविदाधारकास त्याचे पालन करणे बंधनकारक राहील.

23) प्रशासकीय कारणास्तव निविदा नाकारण्याचा किंवा रदद् करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी नाशिक यांना राहतील.

24) पर्यावरण सल्लागाराला जिल्हा वाळु संनियंत्रण समितीच्या बैठकीला व वाळु गटाचे स्थळ निरीक्षण करणाऱ्या तालुकास्तरीय तांत्रीक उपसमितीसोबत उपस्थित राहणे अनिवार्य राहील. तसेच जिल्हयातील नदयांचा वाळु पुर्नभरण दर किती असेल या बाबत अभिप्राय देणे अनिवार्य राहील.

25) अधिसूचित क्षेत्रासाठी पेसा कायदा, 2011 मधील तरतुदींनूसार किंवा त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांनुसार रेतीगटांचे निर्धारण करण्याचे काम करेल.

26) Sastainable Sand Mining Guidelines 2016 व Sand Mining Framework 2018 व केंद्र शासनाच्या पर्यावरण,वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दिनांक 15/01/2016 दि.25/07/2018 मधील तरतुदीनुसार District Survey Report तयार करणे बंधनकारक राहील. दिनांक 25/07/2018 च्या तरतुदीनुसार वाळु व इतर गौणखनिजचे स्वतंत्र District Survey Report तयार करणे बंधनकारक राहील

27) BOQ मध्ये दिलेल्या दरांचे करारनामा करतेवेळी विवरण देणे बंधनकारक राहील.

28) BOQ मध्ये नमुद दरा व्यतीरिक्त अन्य कोणतेही शुल्क अदा केले जाणार नाही.

29) केंद्र शासन, राज्य शासन, मा.न्यायालय व मा.हरित लवाद पर्यावरण विषयक व खाणकाम विषयक वेळोवळो जे आदेश देतील ते निवीदा धारकास लागू राहतील.

30) न्यायालयीन प्रकरणात तांत्रीक सल्ला देणे व मार्गदर्शन करणे बंधनकारक राहील.

31) दर नमुद करतांना GST व इतर सर्व कर विचारात घेऊन सर्व करांसह दर नमुद करावे.

32)

33) निविदेमध्ये सहभागी होण्यास आवश्यक कागदपत्रे

34) **तांत्रिक लिफाफा**

- xv. अट क्र.05 नुसार सक्षम प्राधिकारी/संस्था यांच्याकडून मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार असल्याचे प्रमाणपत्र
- xvi. PAN Card/TAN Card
- xvii. मागील 03 वर्षाचे आयकर भरणा केल्याचे प्रमाणपत्र (IT Returns)
- xviii. GST नोंदणी प्रमाणपत्र
- xix. मागील 02 वर्षाचे संबंधीत क्षेत्रातील कामाचे अनुभव असल्याचे प्रमाणपत्र
- xx. सदर निविदेमधील अटी व शर्ती मान्य असल्याचे हमी पत्र
- xxi. निविदा फी व इसारा रक्कम भरलेली पावती.

(वरील सर्व कागदपत्रे Scan करुन तांत्रीक लिफाफयामध्ये अपलोड करावे लागतील)

ब. **आर्थिक लिफाफा**

i.सदर दर BOQ मध्ये सादर करुन BOQ अपलोड करावा.

(आयुष प्रसाद)

**जिल्हाधिकारी नाशिक**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक
( गौणखनिज शाखा )
जुने सि.बि.एस.जवळ नाशिक
ई-मेल – districminingnsk@gmail.com फोन नं. 0253-2319006

क्र.कक्ष-15/गौणखनिज/2/391/2026 दिनांक 07/05/2026

---

**नाशिक जिल्हयातील वाळू गटांचे खाणकाम आराखडा तयार करणेकामी व पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेणेकामी मान्यता प्राप्त पर्यावरण सल्लागार नेमणूक करिता ई-निविदा**

**ई-निविदा सूचना**

जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक यांच्याकडून सर्व शासन मान्यता प्राप्त पर्यावरण सल्लागार (Accredited Environment Consultant) यांना कळविण्यात येते की, नाशिक जिल्हयातील सन-2026-2027 व 2027-2028 या दोन वर्षाकरिता वाळू गटांच्या खाणकाम आराखडा तयार करणेकामी (Sandghat Mining Plan) Form 1/M, EIA, EMP,PFR, Mining Plan, District Survey Report (For Minor Minerals) व जाहीर लिलावाद्वारे खाणपट्ट्याचे भूविज्ञानकीय तांत्रीक अहवाल (GTR) तयार करण्यासाठी तयार करण्यासाठी ई-निविदा अटी व शर्तीच्या अधीन राहून खालील कालावधीत मागविण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी | दिनांक - 12/05/2026 |
| ई-निविदा स्वीकृती | दिनांक- 13/05/2026 रोजी सकाळी 10.00 वा. पासून ते दिनांक - 26/05/2026 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत |
| ई-निविदा उघडणे | दिनांक - 28/05/2026 रोजी सकाळी 11.00 वा. |

सदरील निविदाबाबत सर्व अटी व शर्ती www.nashik.nic.in व http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

(आयुष प्रसाद )
जिल्हाधिकारी नाशिक

O/C
8/5/26

Signature Not Verified
Digitally signed by Dipak Liladhar Chavhan
Date: 2026.05.12 18:36:37 IST
Location: Maharashtra-MH